**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# तुमच्या यशाची व्याख्या तुम्ही स्वत: तयार करा : थोरात

**पाटण**, दि. २ : संपूर्ण जीवनाच्या वाटचालीत आपल्याला अनेक अडचणींना, संकटांना, समस्यांना, परिस्थितीला सामोरे जावं लागलेलं असतं. त्यातून मार्ग काढत असताना आपले श्रम, बुद्धिमत्ता, माहिती आणि कल्पकता यांचा वापर करून त्यावर मात केली जाते त्याला यश म्हणतात. यश मिळवित असताना नेमकी यशाची व्याख्या काय आहे याचा आपण विचार करणे आवश्यक आहे. तुमच्या यशाची व्याख्या तुम्ही स्वत: तयार करा, असे मत नाबार्डचे अध्यक्ष यशवंत थोरात यांनी व्यक्त केले.



मार्गदर्शन करताना यशवंत थोरात, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयात नवीन शिक्षण पद्धती यावर मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंत थोरात म्हणाले, वास्तविक पाहता मुलांचा आपल्या कुटुंबाबाहेरील रोल मॉडिल हा शिक्षक असतो. म्हणून त्यांनी शिक्षकांनी त्यांचे कार्य पूर्ण कौशल्याने, परिश्रमपूर्वक आणि परिणामकारक करणे आवश्यक आहे. भारतात गुरू हा शब्द प्राचीन काळापासून शिक्षकांसाठी वापरला जात आहे. गुरूचा शाब्दिक अर्थ संपूर्ण म्हणजेच जीवनाची परिपूर्णता प्राप्त करण्याच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आपला मार्ग प्रकाशित करणारा असा होतो. मात्र आजच्या युगात शिक्षण क्षेत्र अनेक बदलांमधून जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये फक्त चांगले शब्द आहेत. पण शाळेच्या पातळीवर त्यांची अंमलबजावणी कशी करायची याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत. यामध्ये स्पष्टता येणे गरजेचे आहे. डॉ. अब्दुल कलाम यांच्यासोबत तीन वर्षे काम करताना त्यांच्यापासून बरेच काही शिकायला मिळाले. डॉ. कलाम यांच्यासोबत काम करताना त्यांना आलेले अनुभव, काही निवडक आठवणी त्यांनी सांगितल्या. नाबार्डचे चेअरमनपर्यंतचा प्रवास कसा झाला तसेच ऑक्सफोर्ड विद्यापीठात त्यांना आलेले अनुभव, मिळालेले ज्ञान याबाबत त्यांनी सांगितले.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमास कोयना एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाखांमधील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.